# उपनिबंधक, सहकारी संस्था, आर-दक्षिण विभाग, मुंबई यांचे कार्यालय

३०३, अे विंग, ३ रा मजला, बी.एम.सी.गोडाऊन इमारत, संस्कृती कॉम्प्लेक्स जवळ, ठाकूर कॉम्प्लेक्स,
९० फुट रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई - ४०० १०१.

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अे) अन्वये आदेश

जा.क्र.मुंबई/उपनि/ आर दक्षिण /८०१/२०१७.
दिनांक - २३/०६/२०१७.

वाचावे : १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) मधील तरतूद.
२. संस्थेचे दिनांक ११/०४/२०१७ रोजीचे विनंती पत्र.
३. श्री सौरभ जैन यांचेकडील दिनांक २६.११.२०१६, १७.११.२०१६,०७.११.२०१६ रोजीचे पत्र.
४.महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) दिनांक १६.०५.२०१७ रोजीची नोटीस.

ज्याअर्थी, धर्मवीर को.ऑप.हौ.सो.लि., प्लॉट नं १ अ , चक्रवती अशोक रोड, कांदीवली (पूर्व) मुंबई - १०१ संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ अन्वये नोंदविण्यांत आलेली असून तिचा नोंदणी क्र. बीओएम/ डब्ल्यु आर/एचएसजी/टीसी/ ३०४८/ सन १९८७-८८ दिनांक २०.१०.१९८७ असा आहे. आणि,

ज्याअर्थी धर्मवीर को.ऑप.हौ.सो.लि., प्लॉट नं १ अ , चक्रवती अशोक रोड, कांदीवली (पूर्व) मुंबई - १०१ (यापुढे संस्था असे वाचावे) या संस्थेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० (यापुढे अधिनियम असे वाचावे), महाराष्ट्र सहकारी संस्थांचे नियम १९६१ (यापुढे नियम असे वाचावे), व संस्थेच्या नोंदणीकृत उपविधी व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय व परिपत्रकामधील तरतूदीस अनुसरुन कामकाज करणे आवश्यक आहे. आणि,

ज्याअर्थी, वरील संस्था बृहन्मुंबईच्या आर दक्षिण विभागात कार्यरत असल्याने त्या संस्थेचे निबंधक, उपनिबंधक, सहकारी संस्था, आर दक्षिण विभाग, मुंबई हे आहेत आणि,

ज्याअर्थी, संस्थेच्या व्यवस्थापक समितीची निवडणूक जूले २०१६ रोजी झालेली असून ६ समिती सदस्य निवडून आलेले आहेत. यापैकी श्री. सौरभ जैन यांनी पदाचा राजीनामा सादर केलेला असल्यामुळे संस्थेचे कामकाज करणेबाबत दिनांक ११.०४.२०१७ च्या पत्राने या कार्यालयाकडे मार्गदर्शन/सल्ला मागितलेले आहे. तसेच संस्थेच्या कार्यालयीन कामकाजाबाबत व इतर मुद्यांबाबतची तक्रार श्री सौरभ जैन यांनी दिनांक २६.११.२०१६, १७.११.२०१६,०७.११.२०१६ च्या पत्राने दाखल केलेली आहे. संस्थेच्या व्यवस्थापक समिती सदस्यांची संख्या ११ असून त्यापैकी श्री सौरभ जैन यांनी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिलेला आहेत. तसेच उर्वरीत ५ जागा रिक्त असल्याचे दिसून येत आहे.आणि,

ज्याअर्थी, वर नमुद केलेली परिस्थिती विचारात घेता आणि सदर राजीनाम्यामुळे, तसेच रिक्त जागेमुळे व्यवस्थापक समितीची गणपुर्ती (Quoram) पुर्ण होत नसुन संस्थेचे कामकाज साक्षेपाने पार पाडता येणार नाही ही वस्तुस्थिती निदर्शनास येत आहे. तसेच राजीनाम्यामुळे/रिक्त जागेमुळे संस्थेच्या समितीच्या रचनेत दोष निर्माण झाला आहे किंवा समितीने कार्य करण्याचे बंद केले आहे व व्यवस्थापनामध्ये पोकळी निर्माण झालेली आहे. सबब संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) अन्वये प्राधिकृत अधिकारी/प्राधिकृत अधिकारी मंडळ का नियुक्त करण्यात येऊ नये? याबाबतचा लेखी खुलासा व तोंडी म्हणणे मांडण्यासाठी संदर्भ क्र ४ अन्वये नोटीस निर्गमित करण्यात आलेली होती.आणि,

ज्याअर्थी, संदर्भ क्र.४ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या नोटीसीच्या अनुषंगाने या कार्यालयात दिनांक ०२.०६.२०१७ व १९.०६.२०१७ रोजी सुनावणी घेण्यात आलेली असून नस्ती निर्णयार्थ बंद करण्यात आले. आणि,

**तक्रारदार श्री सौरभ जैन उपस्थित असून त्यांनी खालील प्रमाणे म्हणणे सादर केले.**

१. संस्थेच्या व्यवस्थापक समितीची गणपूर्ती होत नसल्यामुळे व्यवस्थापक समिती बरखास्त करुन प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणेबाबतची विनंती केली आहे.

**संस्थे तर्फे श्री. अशोक वोरा, श्री हरीष जोशी, श्री मितेश मोदी व श्री राकेश शहा यांनी सुनावणीस उपस्थित राहून खालील प्रमाणे म्हणणे सादर केले.**

१. संस्थेच्या व्यवस्थापक समितीच्या निवडणूकीमध्ये ११ जागा पैकी ६ जागा निवडूण आल्या असून अॅड सौरभ जैन यांनी दिनांक २६.११.२०१६, श्री अशोक वोरा यांनी दिनांक ३१.०५.२०१७, श्री मिलन शहा दि.३१.०५.२०१७, श्री.राकेश शहा दि. १९.०६.२०१७ पदाचा राजीनामा दिलेला असल्यामुळे व्यवस्थापक समितीची गणपूर्ती पूर्ण होत नाही.

ज्याअर्थी, संदर्भ क्र. ४ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या नोटीसीच्या अनुषंगाने संस्थेच्या व्यवस्थापक समितीची निवडणूक ११ जागेंसाठी करण्यात आली असून यापैकी ६ जागा भरण्यात आलेल्या आहेत. व उर्वरित जागा रिक्त ठेवण्यात आलेल्या होत्या. निवडणूकी व्दारे निवडणूक आलेल्या व्यवस्थापक समिती सदस्यापैकी अॅड सौरभ जैन , श्री अशोक वोरा ,श्री मिलन शहा व श्री.राकेश शहा यांनी पदाचा राजीनामा दिलेल्या असल्यामुळे व्यवस्थापक समितीमध्ये २ समिती सदस्य शिल्लक राहतात. आणि,

Scanned by CamScanner

ज्याअर्थी, व्यवस्थापक समिती ११ जागांपैकी ५ जागा रिक्त तसेच ४ समिती सदस्यांनी पदाची राजीनामे सादर केलेली असल्यामुळे संस्थेच्या व्यवस्थापक समितीमध्ये पोकळी निर्माण झालेली आहे. त्यामुळे व्यवस्थापक समितीची गणपूर्ती (Quoram) पुर्ण होत नसल्यामुळे संस्थेचे कामकाज ठप्प झाल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये निबंधकास संस्थेचे व्यवस्थापन हाती घेवून संस्थेचे कामकाज चालविणेसाठी प्राधिकृत अधिकारी नियुक्त करण्यांचे अधिकार आहेत. आणि,

ज्याअर्थी, संस्थेच्या व्यवस्थापक समितीमध्ये पोकळी निर्माण झालेली असल्यामुळे व्यवस्थापक समितीची गणपूर्ती (Quoram) पुर्ण होत नाही. संस्थेचे कामकाज साक्षेपाने पार पाडता येणार नसल्यामुळे संस्थेचे संचालक मंडळ बरखास्त करुन प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करण्याबाबतची वस्तुस्थिती निदर्शनास येत आहे. आणि,

त्याअर्थी वर नमुद परिस्थती विचारात घेता संस्थेचे कामकाज साक्षेपाने पार पाडता येणार नाही ही वस्तुस्थिती निदर्शनास येत असल्यामुळे संस्थेचे दैनंदिन कामकाज चालविण्यासाठी व संस्थेवर त्वरीत कार्यवाही करणे आवश्यक असल्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणेची आवश्यकता असल्याची माझी खात्री झालेली असल्यामुळे, मी खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

## आ दे श

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (१)(बी) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी डॉ. अविनाश भागवत, उपनिबंधक, सहकारी संस्था,आर/दक्षिण विभाग, मुंबई याद्वारे धर्मवीर को.ऑप.हौ.सो.लि., प्लॉट नं १ अ`, चक्रवती अशोक रोड, कांदीवली (पूर्व) मुंबई -१०१ या संस्थेच्या विदयमान व्यवस्थापक समिती निष्प्रभावीत करीत असून संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहणेसाठी श्री. राजेंद्र नामदेव निकम, प्राधिकृत अधिकारी याची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्त करीत आहे.

सदरचा आदेश आज दि. २३/०६/२०१७ रोजी माझी सही व या कार्यालयाच्या मुद्रेसह दिला असे.

(डॉ.अविनाश भागवत),
उपनिबंधक,
सहकारी संस्था, आर दक्षिण विभाग, मुंबई

प्रत,
श्री. राजेंद्र नामदेव निकम, प्राधिकृत अधिकारी
६१-२ री माळा , पहिली क्रॉस लेन , नारायण भुवन
नाम जोशी मार्ग ,भायखडा मुंबई- २७

यांना कळविण्यात येते की, संस्थेच्या माजी पदाधिकारी यांचेकडून दप्तराचा ताबा त्वरीत घेऊन तसा अहवाल या कार्यालयात अवगत करावा.

प्रति,

१) अध्यक्ष / सचिव, धर्मवीर को.ऑप.हौ.सो.लि., प्लॉट नं १ अे, चक्रवती अशोक रोड, कांदीवली (पूर्व) मुंबई -१०१
२) श्री अशोक सी वोरा-चेअरमन, धर्मवीर को.ऑप.हौ.सो.लि., प्लॉट नं १ अे, चक्रवती अशोक रोड, कांदीवली (पूर्व) मुंबई -१०१
३) श्री हरीष जोशी- सचिव, धर्मवीर को.ऑप.हौ.सो.लि., प्लॉट नं १ अे, चक्रवती अशोक रोड, कांदीवली (पूर्व) मुंबई -१०१.
४) श्री मितेश मोदी- खजिनदार, धर्मवीर को.ऑप.हौ.सो.लि., प्लॉट नं १ अे, चक्रवती अशोक रोड, कांदीवली (पूर्व) मुंबई -१०१.
५) श्री राकेश शहा- कमिटी सदस्य, धर्मवीर को.ऑप.हौ.सो.लि., प्लॉट नं १ अे, चक्रवती अशोक रोड, कांदीवली (पूर्व) मुंबई -१०१.
६) श्री मिलन शहा- कमिटी सदस्य, धर्मवीर को.ऑप.हौ.सो.लि., प्लॉट नं १ अे, चक्रवती अशोक रोड, कांदीवली (पूर्व) मुंबई -१०१.
७) कमिटी सदस्य, धर्मवीर को.ऑप.हौ.सो.लि., प्लॉट नं १ अे, चक्रवती अशोक रोड, कांदीवली (पूर्व) मुंबई -१०१.

२/- यांना कळविणेत येते की, संस्थेच्या सपुर्ण दप्तराचा ताबा निवनियुक्त प्राधिकृत अधिकारी यांच्याकडे सुपुर्द करुन तसा अहवाल सादर करावा तसेच सदर नियुक्तीच्या आदेशापासून संस्था पदाधिकारी यांच्या कोणताही आर्थिक बाबी संदर्भात बँक व्यवहार करण्यात येऊ नये. अन्यथा याबाबतची सर्वस्वी जबाबदारी सबंधितांची राहील याची कृपया गंभीर नोंद घ्यावी.

८) व्यवस्थापक,मुंबई जिल्हा गृहनिर्माण सहकारी संस्थाचा संघ,विकास प्रिमायसेस ,फोर्ट मुंबई- ०१
९) चेअरमन/व्यवस्थापक, दि मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, कांदीवली

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

१.मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था मुंबई विभाग मुंबई
२.मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (४) मुंबई
३. निवड नस्ती.

उपनिबंधक,
सहकारी संस्था,आर दक्षिण विभाग, मुंबई

Scanned by CamScanner